क्र.का.३/संगणक/२०१२/३७५
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.
दिनांक - ४/१०/२०१२.

**प्रति**,
१. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक.
२ सर्व सह जिल्हा निबंधक.

**विषय** - आय-सरिता प्रणालीअंतर्गत डाटा एंट्रीमधील चुकाटाळण्याविषयी.

विषयांकित बाबतीत सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक यांना कळविण्यात येते की, आय-सरिता प्रणाली कार्यान्वीत झालेल्या कार्यालयांमध्ये दस्त नोंदणी दरम्यान, डाटा एंट्रीमध्ये चुका झाल्यामुळे, त्या दुरुस्त करण्याविषयी या कार्यालयाकडे विनंत्या प्राप्त होत आहे.

सदर चुका प्रामुख्याने

१. पक्षकारांचा प्रकार (लिहून देणार- लिहून घेणार) चुकीचा निवडला जाणे.

२. पृष्ठांची संख्या चुकीची नमूद करणे.

३. दस्त निष्पादीत केला आहे का? हा पर्याय आवश्यक त्या बाबतीत न निवडला जाणे.

अशा कारणांमुळे घडत आहेत असे प्राथमिक दृष्टया दिसते. तरी डाटा एंट्री योग्यरितीने होण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत सर्व दुय्यम निबंधक यांना त्वरीत कळवावे.

तसेच डाटा एंट्री कोणत्याही माध्यमातून केली तरी, नोंदणी पूर्व गोषवा-याची प्रिंट काढून, त्याची ऑपरेटर्स, पक्षकार व दुय्यम निबंधक यांनी बारकाईने तपासणी करणे आवश्यक असतानाही, व दिसून आलेल्या चुका इनपुट एंट्री मोडयुल मध्येच दुरुस्त करणे आवश्यक असतानाही काही ठिकाणी त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते, शिवाय रजिस्ट्रेशन मॉडयुल मध्ये एंट्री उघडल्यावर, तेथेही डाटा पडताळणी व आवश्यक दुरुस्त्या करणे आवश्यक असताना, त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही असेही दिसून आले आहे.

या दोन्ही ठिकाणी पडताळणी व दुरुस्तीची संधी असतानाही, तेथे दुर्लक्ष करुन, दस्त नोंदणीला सुरुवात केली जाते व स्टॅम्प दोनच्या पुढे गेल्यानंतर, चुका निदर्शनास आल्यावर, दुरुस्तीसाठी या कार्यालयाकडे संपर्क साधला जातो.

यामुळे दुय्यम निबंधक यांचा, पक्षकारांचा व या कार्यालयाचा निष्कारण वेळ वाया जातो. तसेच आय-सरिता प्रणालीबद्दल विनाकारण नकारात्मक चित्र निर्माण होते, हे सर्वथा अयोग्य आहे.

तरी आपण सर्व दुय्यम निबंधक यांना नोंदणीपुर्व गोषवा-याची प्रत प्रिंट काढून, त्याची ऑपरेटर, पक्षकार व स्वतः बारकाईने तपासणी करण्याबाबत तसेच दिसून येत असलेल्या चुका त्याचवेळी दुरुस्त करण्याबाबत निर्देश दयावेत. तसेच रजिस्ट्रेशन मॉडयुल मध्ये एंट्री उघडल्यावरही पुन्हा माहितीची पडताळणीकरण्याची दक्षता घेण्याबाबतही कळवावे.

याप्रमाणे सविस्तर सूचना सर्व संबंधित दुय्यम निबंधक यांना देण्यात आल्या असल्याबाबतचा स्वंयस्पष्ट अहवाल दिनांक १०.१०.२०१२ पर्यंत igr.pmu@gmail.com वर पाठवावा.

**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,**
**(संगणक), पुणे**

**प्रत**

१. मे. एस.एम.सी.कन्सोर्शियम २.मे. वक्रंगी सॉफ्टवेअर्स लि.

२/- वरील बाबतीत आपल्या ऑपरेटर्स यांना सविस्तर सूचना त्वरीत देण्यात याव्यात.

mmm.doc